**<u>तातडीचे</u>**

# राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र


जुने प्रशासकीय महाविद्यालय इमारत, रु.नं.1,2,5 व 6,

हजारीमल सोमानी मार्ग, छत्रपती शिवाजी टर्मिनससमोर, मुंबई-400 001

☎022-22057409 / 22072097 E-mail : mah-sforum@nic.in


जा.क्र.राआ/महा./आस्था-3/अन्न सुरक्षा अपील/2014/ ८० दिनांक 07.01.2014

प्रति,

प्रबंधक
सर्व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच,
महाराष्ट्र राज्य

**विषय ::** **अन्न सुरक्षा व मानदे अधिनियम, 2006 अंतर्गत स्थापित अन्न सुरक्षा अपिलीय लवादाचे कामकाजाबाबत....**

संदर्भ ::
1) शासन अधिसूचना क्र.एफडीएस-1011/प्र.क्र.13/11/औषधे-1, दि.18.03.2013
2) या कार्यालयाचे पत्र क्र.राआ/महाराष्ट्र/आस्था/अन्न सुरक्षा/2013/3180, दि.05.09.2013
3) मा.आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयीन पत्र क्र.अऔप्र/FSSA/दंड व शुल्क/453-13/5, दिनांक 24.12.2013

वरील संदर्भाधीन विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, संदर्भिय क्र.1 च्या शासन अधिसूचनेनुसार या आयोगाच्या अधिपत्याखालील राज्यातील जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाच्या अध्यक्षांना अन्न सुरक्षा अपिलीय लवाद यांचे पिठासीन अधिकारी म्हणून तात्पुरता घोषित करण्यात आलेले आहे. सदर पिठासीन अधिका-यांना विषयांकित अधिनियमतील कलम 68 अन्वये सह आयुक्त (अन्न) तथा न्यायनिर्णय अधिकारी यांचे निर्णयाविरुध्द दाखल अपिलावर अन्न सुरक्षा व मानदे नियम, 2011 चे नियम क्र.3.3 मध्ये नमुद पध्दतीचा अवलंब करुन निर्णय द्यावयाचा आहे. सबब या कार्यालयाद्वारे राज्यातील सर्व जिल्हा मंच कार्यालयांना योग्य त्या सूचना देण्यात आलेल्या आहेत व त्याप्रमाणे कामकाज कार्यान्वित करण्यात आलेले आहे.

त्यानुसार जिल्हा मंचासमोर अपील दाखल होत असून सदरच्या अपीलांसोबत वरील नियमातील कलम 3.3.1 मधील उपकलम 12 मधील तरतुदीनुसार संबंधितांकडून धनाकर्षाच्या (**Demand Draft**) स्वरुपात फी सादर करण्यात येत असल्याने परंतू सदरची फी कोणत्या लेखाशीर्षाखाली जमा करावी, याबाबत स्वयंस्पष्ट निर्देश नसल्यामुळे जिल्हा मंच कार्यालयांकडून या कार्यालयास वारंवार विचारणा करण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने या कार्यालयाचे संदर्भिय क्र.2 च्या पत्रानुसार संबंधित विभागास याप्रकरणी सदरचा लेखाशीर्ष कळविण्याबाबत विनंती करण्यात आलेली होती. संदर्भिय क्र.3 च्या पत्रान्वये मा.आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयाने सदरचा लेखाशीर्ष या कार्यालयास कळविलेला असून शीघ्र माहितीसाठी सदरच्या पत्राची प्रत यासोबत जोडून आपणांस पाठविण्यात येत आहे.

तरी आपणांस याद्वारे सुचित करण्यात येते की, वरील प्रकरणी जमा होणारी रक्कम संबंधित लेखाशीर्षाखाली तातडीने त्या त्या वेळी भरण्यात यावी.

7.1.2014

( दा.ग.पराते )
प्रबंधक प्रशासन,
राज्य आयोग, महाराष्ट्र, मुंबई

<u>प्रत माहितीस्तव व योग्य त्या शीघ्र कार्यवाहीस्तव</u> ः

1) मा.आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
2) प्रबंधक विधी, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई तसेच नागपूर व औरंगाबाद परिक्रमा खंडपीठ
3) लेखाधिकारी, राज्य आयोग, महाराष्ट्र, मुंबई